# प्रेसनोट

जा.क्रं. १२/माहिती कक्ष/वार्तापत्र/२०१६,
कार्यालय पोलीस अधीक्षक, भंडारा,
दिनांक ०४/०१/२०१६.

## ''भंडारा जिल्हा पोलीस कर्मचा–यांसाठी योग प्रशिक्षण योजना राबविण्याबाबत''

**भंडारा** :–जिल्हयातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे जिवन कर्तव्य बजावत असतांना कामामुळे अतिशय ताणतणाव व धकाधकीचे झाले असुन, काही अधिकारी/ कर्मचाऱ्यांना कर्तव्य करीत असतांना स्वत:च्या कुटुंबीयांपासुन वेगळे रहावे लागते ज्यामुळे पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्यामध्ये मानसिक त्रास व नकारात्मकता वाढून नैराश्य उत्पन्न होत असते. सदर बाब गंभीर असुन पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांचे ताणतणाव कसे घालवता येईल व सकारात्मक जीवन आनंदाने कसे जगता येईल? याकरीता केंद्र शासनाचे 'आयुष्य केंद्रीय मंत्रालय' तसेच कैवल्यधाम, श्रीमत माधव योग मंदीर समिती लोनावळा यांच्या मार्फतीने पोलीस अधिकारी/कर्मचारी करीता योग प्रशिक्षण योजना सुरु केलेली असून पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांना योगा व प्राणायमाचे प्रशिक्षण देवून त्यांचे जिवनमान आनंददायक व सकारात्मक स्वरूपाचा दृष्टीकोन घडवून तसेच शारीरिकरित्या निरोगी जिवन जगण्याची कला अवगत व्हावी, हया हेतून भंडारा पोलीस अधीक्षक श्रीमती विनिता साहू यांनी भंडारा पोलीस विभागातील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना पोलीस मुख्यालय, भंडारा येथील ड्रील शेड मध्ये योग व प्राणायम शिबीर सुरू करण्यात आले आहे. सदर योगप्रशिक्षण योग प्रशिक्षक श्री. सुशिल सुरेशपंत काळे, बी.ए योग शास्त्र कवी कुलगुरु कालीदास विदयापीठ रामटेक व एमए. योग शास्त्र हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ अमरावती Bnys Diploma, ccyn certificate course यांची नियुक्ती केलेली असून दिनांक ०१ जानेवारी, २०१७ पासून योग व प्राणायमाचे प्रशिक्षण देवून पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे मानसिक दृष्टीकोण सकारात्मक व निरोगी जिवन घडविण्याचा प्रयत्न योगव्दारे सुरू करण्यात आला आहे. थोडयाच दिवसांमध्ये चैतन्य पोलीस ग्राऊंड येथे मॉर्निग वॉक करीता येणाऱ्या नागरीकांनाही सदर योगा प्रशिक्षनाचा लाभ उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.